गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक ७१ वा | रविवार २८ जुलै २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 71 | Date : 28/07/2024 | blow Sunday | Page 4 | Price 4

# २०४७ पर्यंत विकसित भारत !

## निती आयोगाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विश्वास



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : ''भारताला २०४७पर्यंत विकसित राष्ट्र करणे ही प्रत्येक भारतीयाची महत्त्वाकांक्षा आहे,'' असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी केले. हे ध्येय साध्य करण्यासाठी राज्ये सक्रिय भूमिका निभावू शकतात, कारण त्यांचा थेट जनतेशी संपर्क असतो, असे ते म्हणाले. निती आयोगाच्या नवव्या गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीचे अध्यक्षपद मोदींनी भूषविले. या कौन्सिलमध्ये सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल आणि अनेक केंद्रीय मंत्र्यांचा समावेश आहे.

राष्ट्रपती भवनाच्या सांस्कृतिक केंद्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत उपस्थितांना संबोधित करताना मोदी यांनी आपला देश तरुणांचा असल्याचे सांगितले. तसेच परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी राज्यांनी धोरणे आखावीत, असे आवाहनही त्यांनी या वेळी केले.निती आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, २६ मुख्यमंत्री व नायब राज्यपालांनी बैठकीला हजेरी लावली. बैठकीला मुख्यमंत्री गैरहजर राहिल्यास संबंधित राज्यांचे नुकसान होते, असे आयोगाने स्पष्ट केले. या बैठकीत भारताला २०४७पर्यंत विकसित राष्ट्र करण्यावर । पान २ वर

**हे दशक तंत्रज्ञान आणि भू-राजकीय बदलांचे आहे, तसेच ते संधींचेही आहे. भारताने या संधी साधाव्यात आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीसाठी वातावरण पोषक करावे. भारताला विकसित राष्ट्र करण्याच्या दृष्टीने प्रगतीसाठी हा निर्णायक टप्पा आहे.– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## राज्यसभेत विरोधकांकडून कृषिमंत्र्यांची कोंडी; शेतीमालाच्या हमीभावाच्या कायद्याची मागणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : शेतीमालाच्या किमान आधारभूत किमतीच्या कायद्याच्या मागणीवरून विरोधकांनी राज्यसभेत शुक्रवारी तीव्र हल्लाबोल केल्यामुळे केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांची कोंडी झाली.



तत्कालीन मनमोहन सिंग सरकारनेही हमीभावाचे स्वामिनाथन आयोगाचे सूत्र फेटाळले होते. आता विरोधक हमीभावाचे राजकारण करत आहेत, असा प्रतिवाद करून त्यांनी स्वत:ची सुटका करून घेतली. काँग्रेसच्या सात-आठ खासदारांच्या आक्रमक । पान २ वर

## 'विरोधक लाडक्या बहिणीचे सावत्र भाऊ', मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची टीका

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : महाराष्ट्र सरकारने लाडकी बहीण आणि लाडका भाऊ ही योजना जाहीर केली असली तरी राज्याकडे पैसे नाहीत. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून या घोषणा करण्यात आल्या, असा आरोप विरोधकांकडून होत असताना आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर उत्तर दिले आहे. ते म्हणाले, विरोधकांच्या या वावड्या आहेत. विरोधकांना पोटदुखी झालेली आहे. मी कालही म्हणालो, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना विरोधकांना पचलेली नाही. त्यांना हाजमोला द्यायला पाहीजे. माझ्या लाडक्या बहिणीचे हे सावत्र भाऊ आहेत. माझ्या बहिणींना पैसे मिळता कामा नयेत, ही योजना सुरू होता कामा नये, यासाठी त्यांचा प्रयत्न सुरू आहे. पण सरकार म्हणून आम्ही जेवढा पैसा लागेल तेवढा देऊ.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणाऱ्या निती आयोगाच्या बैठकीला हजर राहण्यासाठी दिल्ली येथे आले असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते पुढे म्हणाले, आम्ही कोणताही निर्णय घेतल्यानंतर मागे हटत नाहीत. आमच्याकडून 'प्रिंटिंग मिस्टेक' झाली असे म्हणत नाही. चुनावी जुमला होता, असे म्हणत नाही. कारण आम्ही पूर्ण विचाराअंती निर्णय घेतला आहे.आमच्या सरकारने महिलांना एसटीच्या तिकीटात ५० टक्के सवलत दिली, ज्येष्ठांना मोफत प्रवासाची मुभा दिली, तेव्हा निवडणुका नव्हत्या. त्यामुळे माझ्या लाडक्या बहिणी आणि भावांनी एक गोष्ट ध्यान्यात घ्यावी की, त्यांच्याविरोधात कोण आहे, अशीही टीका एकनाथ शिंदे यांनी केली.

दिल्लीत सध्या राजकीय घडामोडींना वेग



आला आहे. मुख्यमंत्री शासकीय बैठकीसाठी आले असताना दोन्ही उपमुख्यमंत्रीही दिल्लीत उपस्थित आहेत. त्यामुळे विधानसभेच्या जागावाटपावर काही चर्चा झाली आहे का? असा प्रश्न यावेळी शिंदे यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, जागावाटप योग्यवेळी होईल. महायुतीने दोन वर्षात जे काम केले आहे, त्यानुसार महायुतीला यश नक्की मिळेल.शरद पवार यांनी विविध प्रश्नांसंबधी माझी भेट घेतली होती.। पान २ वर

## राज्यात आणखी दोन दिवस पावसाचेच

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे : राज्यातील बहुतांश भागात पावसाचे धुमशान सुरूच आहे. अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान पुढील आणखी दोन दिवस पावसाचेच असणार आहेत, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने आज दिलेल्या बुलेटीनमध्ये दिली आहे. उद्या कोकण, घाटक्षेत्रात अतिवृष्टी राज्यातील घाटक्षेत्र आणि मध्य महराष्ट्रातील काही भागात पुढील दोन दिवस अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकण, गोवा आणि गुजरात राज्यात । पान २ वर

## केवळ विरोधासाठी विरोध करणारा विरोधी पक्ष लोकशाहीला घातक : केंद्रीय राज्यमंत्री आठवले

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

हैद्राबाद : जीवनाच्या उंच आकाशात झेप घेण्यासाठी तरुणांच्या पंखात कौशल्य विकासातुन रोजगाराचे बळ देणारा यंदाचा केंद्र सरकारचा अर्थसंकल्प आहे. सर्व समाज घटकांना सामाजिक आणि आर्थिक न्याय देणारा अर्थसंकल्प आहे.बिहार आणि आंध्रप्रदेश राज्यांचा काँग्रेसच्या सत्ताकाळापासुन राहिलेला अनुशेष भरुन काढण्यासाठी या राज्यांना केद्रांने विशेष पॅकेज दिले आहे.त्यासोबत तेलंगणा आणि महाराष्ट्रला ही अनेक प्रकल्पासाठी भरीव निधी दिला आहे.कोणत्याही एका राज्यासाठी केंद्राचा बजेट नसतो तर देशातील सर्व राज्यांचा विचार करुन समतोल साधणारा केंद्र सरकारचा अर्थसंकल्प आहे.विरोधी पक्षांनी सरकारला चांगल्या सुचना कराव्यात तसेच सरकारच्या चांगल्या निर्णयाचे विरोधकांनी स्वागत ही केले पाहिजे.राजकारणासाठी केवळ




विरोधासाठी विरोध करणारा विरोधी पक्ष लोकशाहीला घातक असतो असा टोला रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी काँग्रेसला लगावला.

तेलंगणातील मेडक या जिल्हात केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ना.रामदास आठवले बोलत होते.केंद्र सरकारचे प्रतिनिधी म्हणुन केंद्रीय अर्थसंकल्पाची माहिती देण्यासाठी ना.रामदास आठवले आज तेलंगणा दौऱ्यावर आले आहेत.मेडक जिल्हयाचे भाजप खासदार रघुनंदनराव यांनी । पान २ वर

## कल्याणराव काळे यांचे राज्यपाल नियुक्ती विधान परिषद सदस्य पदी निवड करावी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोलापूर जिल्ह्यातील नेते. प्रांतिक सदस्य कल्याणराव काळे यांचे राज्यपाल नियुक्त विधानपरिषद सदस्य म्हणून निवड करावी अशी मागणी शिवस्वराज्य मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सुधीर शिनगारे यांनी पत्राद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे



केली आहे. शिवस्वराज्य मेडिकल फाउंडेशन च्या वतीने पाटण्यात आलेल्या पत्रात कल्याणराव काळे हे गेले अनेक वर्षापासून विविध सामाजिक शैक्षणिक क्रीडा आरोग्य व राजकीय क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करीत असून पंढरपूर तालुक्यात सांगोला मंगळवेढा माढा व मोहोळ विधानसभा मतदारसंघातही त्यांचा निष्ठावंत आहे

## न्यासाकडून धार्मिकतेबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम

### आमदार धीरज देशमुख यांचे प्रतिपादन




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून धार्मिकतेबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक या उपक्रमांना महत्व देऊन देखील कार्यरत असल्याचे मनोगत लातूर ग्रामीण चे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते व माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत विलास सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्षा वैशालीताई विलासराव देशमुख, सौ. दिक्षिका धीरज देशमुख हे उपस्थित होते.यावेळी आमदार धीरज देशमुख यांचे स्वीय सहायक सचिन मोरे, श्री क्षेत्र अक्कलकोटचे शिवराज स्वामी, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे काका, विश्र्वस्त संतोष भोसले, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, शहाजीबापू यादव, निखील पाटील, गोटू माने, पिट्टू साठे, बलभीम पवार, बाळासाहेब पोळ, बाळासाहेब घाटगे, सतीश महिंद्रकर, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस.के. स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विठ्ठल रेड्डी, विश्र्वनाथ कलशेट्टी, खंडेराय होटकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## मावळ हत्याकांडाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करा

### माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

### म्हेत्रेंकडुन अडचणीतील शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्र्यांना निवेदने..

मागील वर्षीचा शेतकऱ्यांचा रखडलेला पिक विमा मिळावा,चेन्नई सुरत ग्रीनफिल्ड हायवेला वाढीव दर मिळावा व त्यासंदर्भात त्वरित बैठक लावावी,सोलापूर जिल्ह्यातील जलजीवनमधील प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावावेत,दुधनी नगरपालिकेला विशेष निधीतुन ५ कोटी रुपये मिळावेत.दुधनीचे प्रशासक सीईओ आतिश वाळुंज यांची बदली करण्यात यावी अशा मागण्यांचे निवेदन माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे दिले. या सर्व प्रश्नांसंदर्भातही मुख्यमंत्र्यांची माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी चर्चा केली.याप्रकरणी लक्ष घालून कार्यवाही करण्याचे आदेश संबंधितांना मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः चार दिवसांपूर्वी मावळ येथे घडलेल्या हत्याकांडाप्रकरणी प्रशासनाने एनडीआरएफची टीम वाढवून मृतांचा शोध घ्यावा आणि त्यांना ५० लाख रुपये आर्थिक सहाय्य करावे,या मागणीसाठी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली.ही भेट मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झाली.मुख्यमंत्र्यांनी या विषयासाठी बराच वेळ दिला होता.यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हेत्रे यांनी दिलेल्या निवेदनांची तातडीने दखल घेत संबंधित विभाग तसेच प्रशासनाला मदतीसंदर्भात आदेश दिले आहेत.विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचा निवेदनाची



दखल घेत पुण्याचे जिल्हाधिकारी व सीपी यांना तात्काळ फोनद्वारे संपर्क साधला व आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले.मदतीसंदर्भात प्रस्ताव पाठवण्याचे आदेश दिले.

चार दिवसांपूर्वी मावळ येथे जी घटना घडली होती.त्यामध्ये मूळचे अक्कलकोटची गवंडी आणि तिकडचे समरीन नेवरेकर कुटुंबियातील ती महिला होती आणि तिचे दोन लहान मुले होते.या तिघांना अमानुष पद्धतीने मारून इंद्रायणी नदीत टाकून देण्यात आले होते.त्या तिघांचा मृतदेह अद्याप मिळालेला नाही.प्रशासनाने बचाव कार्य सुरू केले आहे पण त्यात आणखी वाढ गरजेची आहे.हा विषय गंभीर असून या घटनेची सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई करावी,पीडितांना या प्रकरणात न्याय मिळणे महत्वाचे आहे,असे मुस्लिम समाजाचे नेते अशपाक बळोरगी यांनी सांगितले. । पान २ वर

## संपादकीय

### कोण जबाबदार...

अतिवृष्टी झाल्यानंतरच शहरांचे रस्ते जलमय होतात. परंतु काही वर्षांपासून काही तासांचा पाऊस झाला तरी पाणी साचते. हेच पाणी घराघरांमध्ये शिरुन रोगराई पसरते. जुन्या इमारतींना धोका निर्माण होतो. हे असे का व्हायला लागले याचाही अभ्यास होणे क्रमप्राप्त आहे. काही दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या पावसात एक बाब जाणवते की, निसर्ग कोठेही कोपलेला नाही. ढगफुटीसारखा पाऊस कोठेही बरसला नाही. तरीही नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. नेमके असे काय झाले की, थोड्या पावसात शहरे तुंबतात? नद्या रौद्र रूप का धारण करतात? पावसाचा जोर वाढला की नदीची क्षमता कमी होते? खरे तर, भ्रष्ट, लाचार आणि पैशांभोवती लाळ घोटणारे राज्यकर्ते आणि नोकरशहांच्या पापाचे हे सर्वसामान्यांना मिळालेले फळ आहे. शहरे तुंबण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे पर्जन्यवाहिनीचे अकस्मात थांबणे. पर्जन्यवाहिन्यांचा आराखडा तयार करणारे आणि त्यासंबंधी काम करणारे गांजा पिऊन कामकाज करतात का, असा प्रश्न म्हणूनच पडतो. कारण, या योजना तयार करण्याच्या प्रक्रियेत व त्याचे प्रत्यक्ष बांधकाम करतानाही कोट्यवधींचा खर्च होतो. परंतु निकृष्ट दर्जामुळेच पावसाळ्यात या कामांवर पाणी फेरते. पर्जन्य प्रणालीबरोबर सांडपाणी जाळ्यांची कामे तसेच सिवेज ट्रीटमेंटची कामे, पाणीपुरवठ्याच्या पाइपमधील लिकेज बंद व्हायला हवे. शुद्ध केलेले पाणी लिकेजमुळे गटारात आणि जमिनीखाली जाते. इतर अनेक कामे पालिकेकडून अर्धवटच सोडली जातात. त्यामुळेही शहरांमध्ये पाणी तुंबते. त्यासाठी सरकारी धोरणांमध्ये आमूलाग्र बदलही अपेक्षित आहेत. हल्ली मोठी वादळे किनारपट्टीवर धडकणे किंवा जास्त प्रमाणात पाऊस बरसणे हे नित्याचे झाले आहे. हे वातावरणातील मोठे बदल निसर्गनिर्मित आहेत का मानवनिर्मित, या गोष्टींमधील वादाचे मुद्दे सोडले तरी त्यावर दीर्घकालीन उपाय शोधायलाच हवा. नैसर्गिक नाले बुजवल्यामुळेही पाणी साचण्याचे प्रमाण वाढले आहे. मुंबई, ठाणे, पुण्यासारख्या मोठ्या शहरांपासून वसई-विरार, कल्याण, नाशिक, अहमदनगर, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, मिरज, सातारा यांसारख्या छोट्या शहरांतील बहुतांश नैसर्गिक नाले भूमाफिया आणि बिल्डर्सनी गिळंकृत केले आहेत. या शहरांमध्ये बांधकाम व्यवसायाला बरकत आल्यानंतर टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या. त्या बांधताना जमीन सिमेंट-काँक्रिटने झाकली गेली. जमिनीच्या त्येक तुकड्याचा वापर करण्याची स्पर्धा सुरू झाली. मोठमोठी अतिक्रमणे नैसर्गिक संपदेवरच होत आहेत

# राजकीय षडयंत्र करणाऱ्या भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांचा पंढरपूर शिवसेनेच्या वतीने केला निषेध

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी:राजकीय षडयंत्र करून खोट्या गुनात अडकवण्याचा प्रयत्न करणाऱ्या देवेंद्र फडणवीस आणि भाजप यांचा शिवसेनेच्या वतीने शिवाजी चौकामध्ये जाहीर निषेध करण्यात आला सेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात निषेच्या घोषणा घोषणा देऊन कटक असतानाचा निषेध करण्यात आला. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवा नेते आदित्य ठाकरे व आमदार अनिल परब यांना खोट्या पुण्यामध्ये अडकवण्याचा प्रयत्न उघडा पडला.तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर दबा आणून खोटे शपथ पत्र



तयार करण्याचा डाव देशमुख यांनी हाणून पाडला. भाजप हे कुटिल शेयंत्र या निमित्ताने उघडे पडले विद्यमान गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय खालच्या पातळीचे राजकारण करीत असून त्यांच्या निषेध करण्यासाठी पंढरपूर शहर व तालुका शिवसेनेच्या वतीने निषेध करण्यात आला.यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना तालुका प्रमुख बंडू दादा घोडके अभंगराव जयवंत अण्णा माने शहर प्रमुख रवींद्र मुळे व समन्वयक लंकेश दादा बुरांडे संजय घोडके पवन शिंदे नागेश्र्वरी तोंड अजित शेवतकर अनिल रोंगे माऊली मासाळ कल्याण कदम तालुका संघटक इंद्रजीत गोरे तालुका समन्वयक कार्यक्रम भोसले संजय पवार बाळासाहेब भोसले पवार भाभी पठाण लोकमान्य इनामदार अंकुश विलास माने आधी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मिरगव्हाण येथील असंख्य कार्यकर्त्यांचा नारायण पाटील गटातून आमदार संजय मामा शिंदे गटात जाहीर प्रवेश

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः करमाळा तालुक्याचा पूर्व भाग हा राजकीय दृष्ट्या अतिशय महत्त्वाचा भाग मानला जातो या भागावरती माजी आमदार नारायण पाटील यांचे वर्चस्वती परंतु चालू पंचवार्षिक मध्ये अनेक विकास कामाच्या माध्यमातून व सातत्याने दहिगाव उपसा सिंचन योजना चोळी चालवून आमदार संजय मामा शिंदे यांनी या पूर्व भागातील अनेक गावात माजी आमदार नारायण पाटील यांच्या गटाला सुरु लावलेला असून त्यांचे



पडसाद अद्याप उमटत आहेत यापूर्वीच नारायण पाटील गटाचे अपूर्व भागातील पांडे म्हशेवाडी अर्जुन नगर कुंभोज पिसारे हिरवे इत्यादी गावातील असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार शिंदे गटात प्रवेश केलेला आहे.आज दिनांक २७ रोजी २०२४ रोजी मिरगव्हाण येथील असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार संजय मामा शिंदे यांच्या गटात जाहीर प्रवेश केला व प्रवेश करणारा मध्ये प्रामुख्याने बाबुराव सुंदर दास गोयंकर. लक्ष्मण गोयंकर. बाळू गोयंकर यशवंत सेना तालुका अध्यक्ष शरदचंद्र घरबडे. कळंबा गरबडे किरण घरबडे विश्र्वनाथ घरबडे संजोग घरबडे रोहित गोयंकर रवींद्र गोयंकर पंकज गणगे दत्तात्रय शिंदे पांडुरंग शिंदे दिनेश हाके नागेश उघडे विठ्ठल हाके राजेंद्र गोयंकर विजय हाके बाळू गोयंकर अशोक गोयंकर आदींनी प्रवेश केला आहे या प्रवेश वेळी देवीचा मळाचे माजी उपसरपंच अनिल पवार उंदरगावचे उपसरपंच शिवाजी कोकरे उंबरगावचे बाबुराव खुळे आधी जर उपस्थित होते

# स्वेरीज् डी.फार्मसीचे यंदाही निकालात घवघवीत यश

## प्रथम वर्षात सिमरन खतीब प्रथम तर द्वितीय वर्षात अमृता वाघ प्रथम

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित डिप्लोमा फार्मसी महाविद्यालयाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाल्याची माहिती फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी दिली. त्यामध्ये प्रथम वर्षात सिमरन युनुस खतीब तर द्वितीय वर्षात अमृता प्रकाश वाघ या विद्यार्थिनी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या. डी. फार्मसी महाविद्यालयाने बोर्डाच्या परीक्षेतील यशाची परंपरा यावर्षी देखील जोपासली आहे. विशेष म्हणजे डी. फार्मसी निकालात विद्यार्थिनींनी अव्वल स्थान पटकावले आहे यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत




आहे.पंढरपूर परिसरातील व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिप्लोमा फार्मसीच्या शिक्षणासाठी यापूर्वी मुंबई, पुणे, सांगली, सोलापूर अशा मोठ-मोठया शहरात जावे लागत होते. वेळ व पैसा यांचा अपव्ययही होत होता. विद्यार्थ्यांची होणारी ही गैरसोय पाहून शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी करत असताना संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांनी पंढरपूर पंचक्रोशीत फार्मसीचे महाविद्यालय सन २००६ साली उभे केले. याला विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आणि त्यातून ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्च शिक्षण घेवू लागले. बऱ्याचदा अनेक जण प्रवेशासाठी इच्छुक असूनही केवळ मर्यादित प्रवेश संख्येमुळे त्यांना शिक्षण घेता येत नव्हते त्यामुळे पालकांची अपेक्षा वाढली. पुन्हा स्वेरी अंतर्गत सन २०२१ पासून डी. फार्मसीचे दुसरे नवीन महाविद्यालय उभे केले. अशा प्रकारे डी. फार्मसीची दोन महाविद्यालये स्वेरी कॅम्पस मध्ये थाटात उभी आहेत. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या डिप्लोमा फार्मसीच्या परीक्षेत द्वितीय वर्षामध्ये अमृता प्रकाश वाघ यांनी प्रथम (८५.१८ टक्के), प्रतिक्षा तानाजी जाधव यांनी द्वितीय (८४.२७ टक्के) व सुवर्णा उद्धव कोलते यांनी तृतीय क्रमांक (८३.७३ टक्के) मिळविला तसेच प्रथम वर्षामध्ये सिमरन युनुस खतिब यांनी प्रथम (८०.०३ टक्के), साक्षी प्रकाश वाघ यांनी द्वितीय (८०.०० टक्के) व अश्र्विनी शशिकांत करणवार यांनी तृतीय क्रमांक (७७.०१ टक्के) मिळविला. यशस्वी विद्यार्थ्याना स्वेरीचे संस्थापक-सचिव डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व फार्मसी कॉलेजचे प्राचार्य मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली सर्व प्राध्यापकांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक-सचिव डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख यांच्यासह संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, इतर महाविद्यालयांचे प्राचार्य आणि डिप्लोमा फार्मसीचे विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र कंदले, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

पान १ वरुन

### मावळ हत्याकांडाची चौकशी

यावेळी बोलताना म्हेत्रे म्हणाले की, मावळमधील घटना ही अतिशय दुर्दैवी आहे,अशी घटना कोणाच्याही बाबतीत होऊ नये.गवंडी कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे,त्यांना आर्थिक मदत मिळावी ही आमची प्रमुख मागणी होती,असे त्यांनी सांगितले.यावेळी सोलापुर जिल्हा काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष अशपाक बळोरगी,मल्लिकार्जुन पाटील व गवंडी कुटुंबिय उपस्थित होते.

### केवळ विरोधासाठी विरोध..

ना.रामदास आठवले यांचे मेडक जिल्हयात स्वागत केले.मेडक जिल्हा भाजप कार्यालयात केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेस संबोधीत केले. यावेळी भाजप आणि रिपब्लिकन पक्षाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते

काँग्रेस सरकारच्या काळात अनेकदा काही राज्याना विशेष पॅकेज देण्यात आले होते.आंध्रप्रदेश आणि बिहार ला मात्र कोणतेही पॅकेज दिले नव्हते.त्यामुळे आंध्रप्रदेश आणि बिहाराचा अनुशेष भरून काढण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदीच्या नेतृत्वातील एन डी ए सरकारने आंध्रप्रदेश आणि बिहारला विशेष आर्थीक पॅकेज दिले आहे.त्या सोबत देशभरातील सर्व राज्यांना समतोल साधणारे बजेट दिले आहे.दलित आदिवासी,ओबीसी,मध्यमवर्ग सर्वांना प्रेरणादायी असा केंद्राचा अर्थ संकल्प आहे. ४ कोटी तरुणांना रोजगार देणारा अर्थ संकल्प आहे.चांगल्या निर्णयांना खोटी कारणे सांगुन विरोध करणे केवळ राजकारणासाठी सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध करणे ही काँग्रेसची वृत्ती लोकशाही ला घातक आहे असे ना.रामदास आठवले म्हणाले. केंद्र सरकारची अग्निवीर योजना युवकांना रोजगार देणारी आहे.४वर्ष सेवा केल्यानंतर अग्नीविरांना भारतीय सैन्यांत रोजगाराची संधी दिली जाते.तसेच अनेक राज्यात नोकरीसाठी अग्निविरांना प्रधान्य दिले जाते.असे ना.रामदास आठवले यांनी सागीतले.

### राज्यसभेत विरोधकांकडून ..

पवित्र्यामुळे सभागृहात प्रचंड गदारोळ झाला.केंद्र सरकार हमीभावाचा कायदा करणार की, नाही याचे 'हो' किंवा 'नाही' या एका शब्दांत उत्तर देण्याची मागणी काँग्रेसच्या सदस्यांनी केल्याने चौहान हैराण झालेले दिसले. समाजवादी पक्षाचे रामजी लाल सुमन यांनी हमीभावाचा कायद्यासंदर्भात प्रश्र्न विचारला होता. त्यावर कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी, हमीभावासंदर्भातील समितीचा अहवाल सरकारला मिळालेला नाही. त्यानंतर निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केले. चौहान यांनी केंद्र सरकारने दरवर्षी २३ पिकांचे हमीभाव कसे वाढवले व स्वामिनाथन समितीच्या शिफारशींच्या आधारे उत्पादनशुल्काच्या पन्नास टक्के नफा देणारा हमीभाव दिल्याची यादी वाचून दाखवली. मात्र, हमीभावाचा कायदा करण्याबाबत कोणतेही ठोस आश्र्वासन दिले नाही.

अर्थसंकल्पाच्या चर्चेमध्ये काँग्रेसचे रणदीप सुरजेवाला यांनी पिकांना स्वामिनाथन सूत्रानुसार हमीभाव दिला जात नसल्याचा दावा केला होता. हाच मुद्दा शुक्रवारी प्रश्र्नोत्तराच्या तासाला समाजवादी पक्षाचे खासदार सुमन यांनी उपस्थित केल्याने सुरजेवाला यांना केंद्र सरकारविरोधात कोलीत मिळाले. सुरजेवाला यांनी सभागृहात अत्यंत आक्रमक होत हमीभावाच्या कायद्याची मागणी करणारी घोषणाबाजी केली.

काँग्रेस सदस्यांच्या मागणीवर सभापती धनखड संतप्त झाले. काँग्रेसचे सदस्य शेतीवरील चर्चेत अडथळे आणत असून ते शेतकरीविरोधी आहेत, अशी आश्र्चर्यकारक टिप्पणी धनखड यांनी केली. सभागृहात चर्च करू न देणे हा शेतकऱ्यांची सेवा करण्याचा मार्ग नव्हे, तुमच्यापेक्षा (सुरजेवाला) मी जास्त शेतकरी आहे, जयराम रमेश तुम्हाला शेतीतील काही कळत नाही, तुम्ही (काँग्रेस) राजकारण करत आहात, तुम्ही १० वर्षे सत्तेत होतात, तुम्ही शेतकऱ्यांसाठी काय केले? कृषिमंत्री चौहान शेतकऱ्यांबाबत अत्यंत संवेदनशील आहेत, अशी टिप्पणी सभापती धनखड यांनी केली.

### २०४७ पर्यंत विकसित ..

लक्ष केंद्रित करण्यात आले. त्यासाठी केंद्र व राज्यांचा प्रशासनातील सहभाग आणि सहकार्य, सरकारी योजना सक्षमपणे लागू करून ग्रामीण व शहरी भागांमध्ये जीवनाची गुणवत्ता वाढवणे याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. तसेच, गेल्या वर्षाच्या अखेरीस डिसेंबरमध्ये झालेल्या मुख्य सचिवांच्या तिसऱ्या राष्ट्रीय परिषदेमध्ये करण्यात आलेल्या शिफारशींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, अशी माहितीही आयोगाने दिली.

### राज्यात आणखी दोन दिवस

उद्या (शनिवारी) पावसाचा जोर कायम राहणार आहे. त्यानंतर पावसाचे प्रमाण कमी येईल. तसेच पुढील दोन दिवसांत मध्य भारतात मुसळधार पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे, असेही भारतीय हवामान विभागाने म्हटले आहे. महाराष्ट्रासह 'या' राज्यातही मुसळधार उद्या (शनिवारी) मध्य प्रदेश, छत्तीसगडमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच महाराष्ट्रातील विदर्भ, कोकण आणि गोवा (२७, २८ जुलै), मध्य महाराष्ट्र (२८ जुलै), सौराष्ट्र आणि कच्छ (२८ आणि २९ जुलै) तर संपूर्ण गुजरातमध्ये २७ जुलै ते २९ जुलै दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

### 'विरोधक लाडक्या बहिणीचे

यावेळी आरक्षणासंबंधी आम्ही चर्चा केली. जाती-जातीवरून महाराष्ट्रात तणाव दिसत आहे.

गावबंदीसारखे प्रकरणे घडत आहेत. याआधी महाराष्ट्रात असे कधी घडले नव्हते. महाराष्ट्र पुरोगामी राज्य आहे, इथे सर्व लोक गुण्या-गोविंदाने राहतात. ओबीसी आणि मराठा समाजाच्या नेत्यांना एकत्र बसवून बैठक घेतली पाहीजे, असे त्यांनी सूचविले. मीही याला समर्थन दिले. निवडणूक येतात आणि जातात. पण जे वातावरण बिघडले आहे, ते पूर्वपदावर आणणे गरजेचे आहे.

# जिल्हा परिषद कन्नड मुली शाळा मैंदर्गी मुलींना फ्री बसपास

अक्कलकोट/प्रतिनिधीः जिल्हा परिषद कन्नड मुली शाळा येथे शिक्षण घेत असलेले शाळेपासून लांब असलेले मुलींना अहिल्याबाई होळकर फ्री बस पास अक्कलकोट आगर कडून देण्यात आले मैंदर्गी शाळेला आजू बाजूतील गावातून नागोर,बिंजगीर, हाल हल्ली ,तोरणे ,असे अनेक गावातून मैंदर्गी येथे शाळेत विद्यार्थिनी येतात येणाऱ्या मुलींना गैरसोय होऊ नये म्हणून अहिल्याबाई होळकर मोफत पास या योजनेतून मुलींना मोफत पास मिळवण्यासाठी मुख्याध्यापक श्री महांतेश्र्वर कट्टीमनी यांनी अक्कलकोट आगर प्रमुख माननीय जुनोनी मदनीभाषा भाऊदिन यांना आगर व्यवस्थापक कार्यालयात जाऊन विनंती केल्याने विनंतीला मान देऊन वाहतूक प्रमुख श्री हनुमंतराव आगरखेड यांना आमचे शाळेवर



पाच देण्यासाठी पाठवून दिले त्यांनी शाळेत येऊन जाऊन करणारे सर्व मुलींना अहिल्याबाई होळकर मोफत पास दिले या मुळे पालक व विद्यार्थी यांनी आनंदी व्यक्त केले. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री सागर गोब्बुर् यानी पास देण्यासाठी शाळेत आलेले वाहतूक नियंत्रक श्री हनुमंतराव आगरखेड यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केले यावेळी शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# शेतकऱ्यावर पुराचे संकट शेतकरी चिंताग्रस्त

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



टाकळीवाडी/प्रतिनिधी : शिरोळ तालुक्यातील दुधगंगा, पंचगंगा, कृष्णा, नदीची पाण्याची पातळी भरपूर वाढलेली आहे. अनेक शेती आता पाण्याखाली गेलेली आहे.

भुईमूग, ऊस, पिके सध्या पाण्याखाली आहेत. अनेक धरणातून विसर्ग मोठ्या प्रमाणात चालू आहे. लहानाचे मोठे पीक करून सुद्धा हाती लागत नाही. शेतकरी चिंताग्रस्त झालेला आहे. महागाईचे खते, बी बियाणे, याकडून शेतकरी मुळातच कंगाल झालेला आहे.यातच महापुराचे संकट अनेक शेती पाण्याखाली आहे. अजून किती पाणी वाढणार याचा अंदाज येत नाही. शेतकरी जगायचा कसा हा प्रश्न पडलेला आहे. शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झालेले आहे. जनावरांच्या चाराचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

# प्रशासकीय अधिकारी यांची शिरोळ तालुक्यातील पूर परिस्थितीची पाहणी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

शिरोळ : शिरोळ तालुक्यामध्ये खिद्रापूर, राजापूर, राजापूरवाडी, हेरवाड, तेरवाड, कुरुंदवाड या ठिकाणी पुरपहाणी दौरा पार पाटील यांनी हा दौरा पार पडला. सदर दौऱ्यामध्ये खिद्रापूर येथे शिरोळ तहसीलदार मा. अनिलकुमार हेलकर, शिरोळ तालुक्याचे बीडीओ मा. घोलप साहेब, कुरुंदवाड पोलीस



स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा. फडणवीस साहेब तसेच तालुक्याचे सर्व सरकारी अधिकारी यांच्या समवेत चर्चासत्र पार पडलं, यावेळी तालुक्यातील एकूण पूर परिस्थिती यासंदर्भात डॉ. संजयदादा पाटील यांनी शासनाच्या सर्व पडला. खिद्रापूर येथे सदर पाणी दौऱ्यामध्ये केंद्रीय रसायन खत मंत्रालय महामंडळाचे संचालक डॉ. संजयदादा पाटील व भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ॲड. सुशांत अधिकाऱ्यांसोबत विस्तृत चर्चा केली, गरज पडलीतर महाराष्ट्र सरकार आणि भारतीय जनता पार्टी सर्व ताकतीने आपल्याबरोबर असा विश्र्वास यावेळी व्यक्त केला.

# पूरग्रस्तांच्या मदतीला पुन्हा धावला श्री.गुरुदत्त कारखाना, पूरग्रस्तांसाठी उभी केली छावणी

पत्रकार नामदेव निर्मळे

शिरोळ तालुक्यात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. शिरोळ तालुक्यातील सर्व पूरग्रस्त लोकांना आणि जनावरांना आधार देण्यासाठी शनिवार दिनांक २७ जुलै पासून गुरुदत्त शुगर्स यांच्या वतीनं कार्य स्थळावर पूरग्रस्त लोकांसाठी पूरग्रस्त छावणी उभी केली. असल्याची माहिती गुरुदत्त चेअरमन माधववराव घाटगे यांनी दिली. मदतीचा हात म्हणून शेतकऱ्यांची, जनतेची आणि मुक्या जनावरांची होणारी बिकट अवस्था पाहून जनावरांची छावणी तसेच लोकांना निवाऱ्याची सोय करण्याचा निर्णय श्री. गुरुदत्त कारखान्याचे चेअरमन श्री.माधवराव घाटगे साहेब तसेच एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर श्री राहुल दादा घाटगे यांनी घेतला आहे .कारखान्यावर निवाऱ्याची व्यवस्था तसेच जनावरांची छावणीची सोय करण्यात आली आहे. शिरोळ तालुक्यात २००५, २०१९, व २०२१ यासाठी आलेत्या महापुरात गुरुदत्त शुगरने मोलाची मदत केली आहे.

# संजय गांधी योजनेत लाभार्थींची २२४ प्रकरणी मंजूर

## तहसीलदार सचिन लंगोटे शासनाच्या योजनेत जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी भाग घेण्याचे आवाहन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



पंढरपूर/प्रतिनिधीः आणखी एक मोठी योजना लाडके बहिण व्यंजने तर आता राज्य सरकारची आणखी एक योजना समोर आली आहे लाडकी बहीण योजनेत राज्यातील महिला महिला दीड हजार रुपये देण्यात येणार आहेत या योजनेनंतर सरकारने शेतकऱ्यांसाठी नवीन योजना आणली आहे त्या शेतकऱ्यांना पाच वर्षे मोफत वीज देण्यात येणार आहे साडेसात एचपी अश्र्वशक्ती पर्यंत कृषी पंप असणाऱ्या शेतकऱ्यांना पाच वर्ष मोफत वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे ही योजना एप्रिल २०२४ पासून लागू राहणार आहे यंदाच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी ही योजना जाहीर केल्या व राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना ही योजनेचा लाभ मिळणार आहे मोफत वीज योजनेचा आढावा घेतला जाणार आहे त्यानंतर दोन वर्षे योजना राबवण्याबाबत निर्णय होईल शासनाच्या या योजनेचा फायदा शेतकऱ्याप्रमाणे महावितरण ल्र होणार आहे महावितरण च्या कृषी पंपाच्या वीज बिलाची वसुलीची चिंता मिटणार आहे महावितरणला राज्य सरकार वीजबिलापोटी १४ हजार ७०७ कोटी रुपये देणार आहे

# मंगळवेढ्यात चोरीच्या मोटरसायकली जप्त ;

## पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांची धडाकेबाज कारवाई

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः मंगळवेढा शहरात मोटरसायकली चोरीचे प्रमाण वाढत असल्याने निदर्शनात येताच नव्याने दाखल झालेली पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांनी चोरीच्या तपासासाठी डीपी पथक तयार करून त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला यामध्ये डीबी पथकाला एक लाख पाच हजार रुपये किमतीच्या जुन्या वापरल्या तीन मोटरसायकली शोध घेण्यात यश आले आहे मंगळवेढा शहरात भर दिवसा मोटरसायकली गायब झाल्याच्या तक्रारी मंगळवेढा पोलीस ठाण्यात दाखल झाल्या होत्या या चोरीच्या अर्धा फास करण्यासाठी पोलिसांचे देवी पथक नेमण्यात आले असून यामध्ये पोलीस उपनिरीक्षक पुरुषोत्तम धआपटए



दरम्यान आरोपी सिद्धेश्र्वर मारुती कदम राहणार मुंडे यांच्याकडे चोरीच्या मोटरसायकली असल्याची माहिती मिळतात सदर आरोपीस ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता तीन मोटरसायकल मिळून आल्या यामध्ये होता तावडे सोलापूर शहरातील एम एच १३ ए आर ५४ १४ ही ३०००० रुपये किमतीची एम एच १३ सीएम ९१ ०१ ४५ हजार रुपये किमतीचे इमेज १३ बीए ९५ ५९ ३० हजार रुपये किमतीची. मंगळवेढा शहरातील दोन अशा एकूण एक लाख रुपये पाच हजार रुपये मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे ही कामगिरी पोलीस अधीक्षक शिरीष सर देशपांडे अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर मंगळा पोलीस उपविभागीय गायकवाड साहेब तसेच मोहोळ चे पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली

# अधिकाऱ्यांचे दूर्लक्ष: पिंपळगाव सोनारा ते साखरखेर्डा रस्त्याची दुरावस्था शालेय विद्यार्थी व नागरीकांची गैरसोय..

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा / राहुल साबळे : सिंदखेडराजा तालुक्यामध्ये पिंपळगाव सोनारा ते साखरखेर्डा रोडची झालेली दुर्दशा साखरखेर्डा ते पिंपळगाव सोनारा ५ किलोमीटरचा रस्ता आहे. या रस्त्यावर गड्डे पडलेले आहेत या गड्यामुळे शाळेत येणाऱ्या मुलींचे अत्यंत हाल सुरू आहे.मुली नेण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यासाठी मानव विकास गाडी सुरू केली होती. ती गाडी सुद्धा या रस्त्यामुळे महामंडळाने बंद केली आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचे अतोनात हाल होत आहे तसेच विद्यार्थ्यांवर आर्थिक भुर्दंड पडत आहे

पिपळगाव सोनारा हे ग्रामीण भागात येत असल्यामुळे येथील लोकांचा शेती हा व्यवसाय आहे आज शेती हा व्यवसाय पूर्णतः तोडयात चालले आहे त्यामुळे स्वखर्चाने काही पालक हे विद्यार्थ्यांना शाळेत पाठवू शकत नाही त्यामुळे त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे नाही तर विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ या रस्त्यामुळे आली आहे या रस्त्यावरून मेरा बुद्रुक ते साखरखेर्डा रोडचे सुद्धा रहद्दरी होत आहे पिपळगाव सोनारा ते सिंदखेडराजा या ठिकाणी जाण्यासाठी सुद्धा पिपळगाव सोनारा येथील लोकांना याचा रस्त्यावरून जावा लागत आहे पिंपळगाव सोनारा येथील लोकांचे तालुक्याचे ठिकाणी बरेच कामे असतात तसेच दवाखाना तहसील इतर कामासाठी सुद्धा याच रोड वरुन जावे लागत आहे तर या रस्त्यावरून जात असताना आपला जिव मुठीत धरून जाव लागत आहे रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता अशी परिस्थिती या रोडची झाली आहे त्यामुळे या रस्त्यावर किरकोळ अपघात सुद्धा झाले आहे वरिष्ठ अधिकारी या ठिकाणी कोणाची मरणाची वाट पाहत आहे की काय अशी परिस्थिती या रोडमुळे झाली आहे जर या रस्त्यावर अपघात झाला व जिवीत हानी झाले



याची पूर्णता जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद बुलढाणा यांची राहील अशी चर्चा सुद्धा पिपळगाव सोनारा येथील सुज्ञ नागरिक करीत आहे या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद बुलढाणा यांनी त्वरित लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे पिंपळगाव सोनार ते साखरखेर्डा येथून ४० ते ५० विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी पिंपळगाव सोनारावरून साखरखेर्डा सिंदखेडराजा या ठिकाणी जात आहे त्यांना सुद्धा या रोडचा आर्थिक आणि मानसिक त्रास होत आहे . जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे इंजिनीयर म्हेत्रे साहेब यांना वारंवार फोन करूनही सुद्धा अजून त्यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही पिंपळगाव सोनारा ते साखरखेर्डा येथे रोडवरील गड्ड्यांमुळे गावकरी त्रस्त झाले. पिंपळगाव सोनारा येथील मुलींना शाळेत जाण्यासाठी आर्थिक आणि मानसिक त्रास होत आहे. तरी या रोडवरील गड्डे दाबून व व्यवस्थित रोड करून मानव विकासची बस सुरू करण्यात यावी अशी गावकऱ्यांची मागणी आहे.

# जगद्गुरू पंचाचार्य प्रशालेत शिक्षण सप्ताह उत्साहात साजरी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीःगौडगाव बु!! येथील श्री गुरु सिद्ध मल्लेश्र्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत शिक्षण सप्ताह २२ जुलै पासून उत्साहात सुरू झाला असून यावेळी शिक्षण सप्ताह शासनाच्या नियोजन प्रमाणे विविध उपक्रम राबवण्यात आले.यामध्ये विशेषतः अध्ययन अध्यापन साहित्य,निर्मिती करणे,गणितीय परिपाठ गणित तज्ञांची माहिती निपुण प्रतिज्ञा,सांस्कृतिक कार्यक्रम. पारंपारिक वेशभूषा ,लावणी, नृत्य , माती काम ,पिशवी तयार करणे.वृक्षारोपण शालेय पोषण आहार व त्यातून मिळणारे उष्मांक इत्यादी बद्दल माहिती विषय शिक्षकाकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

शिक्षण सप्ताहात विद्यार्थी व विद्यार्थिनी उस्फूर्तपणे आपला सहभाग नोंदवला. या शिक्षण सप्ताहाचे उदघाटन मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पर्यवेक्षक लाडप्पा शिंदे, महेश स्वामी,शरणया हिरेमठ, भारती पोतदार,रामण्णा




ळिंबीतोटे,शिवपुत्र चोळे, गंगाधर नागशेट्टी, परमेश्र्वर होसुरे.,तुकाराम जाधव, सुभाष घोडके,पोपट सोनकांबळे,वीरेश दानशेट्टी, श्रीशैल सावळतोट,लक्ष्मीपुत्र देशेट्टी,मृत्युंजय सालीमठ,अमरेश तारके, काशिनाथ दानशेट्टी, सोनाली साठे, रेणुका चांनकोठे,अशोक गुरव,विश्र्वराध्य हिरेमठ, बसवराज कुंभार,मल्लिनाथ मैत्री,नागनाथ जमादार, गुरुपादया स्वामी,भीमाशंकर जमादार. आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवपुत्र चोळे यांनी केले तर पोपट सोनकांबळे यांनी आभार मानले.

# अन्नछत्र मंडळ राज्यातच धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीयरित्या कार्यरत : डॉ. भावार्थ देखणे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळ राज्यातच धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीयरित्या कार्यरत असल्याचे मनोगत श्री क्षेत्र आळंदी देवस्थानचे विश्र्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी ते बोलत होते.

यावेळी न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी, शहाजीबापू यादव, निखील पाटील, गोटू माने, पिट्टू साठे, बलभीम पवार, बाळासाहेब पोळ, बाळासाहेब घाटगे, सतीश महिंद्रकर, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस.के. स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विठ्ठल रेड्डी, विश्र्वनाथ



कलशेट्टी, खंडेराय होटकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज कडून जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेतील विद्यार्थांना शालेय साहित्य वाटप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**


अक्कलकोट/ प्रतिनिधीःकिर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज शिवशाही,सोलापूर यांच्या कडून सी एस आर अंतर्गत श्री जगदगुरू पंचाचार्य प्रशाला,गौडगाव बु प्रशालेतील गरीब,होतकरू,गरजू विद्यार्थ्यांना शालेय बॅग, कंपास बॉक्स, वही वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्र्वस्त शिवाचार्यरत्न .श्री.ष.ब्र डॉ.जयसिध्देश्र्वर शिवाचार्य महास्वामीजी होते,तसेच किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीजचे मॅनेजर ऋषिकेश कुलकर्णी, एच,आर मॅनेजर अनंत जाधव,ऑफिसर गुलाबचंद रजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत शालेय साहित्य वाटप करण्यात आले. किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज शिवशाही यांनी नेहमीच गरीब होतकरू, गरजुवंत विद्यार्थी शिक्षणापासून विद्यार्थी वंचित राहू नये म्हणून नेहमीच एक हात मदतीचा म्हणून प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करतात हे कार्य कौतुकास्पद असल्याचे महास्वामीजी यांनी बोलताना म्हणाले, यावेळी उपस्थित मान्यवरांचे मुख्याध्यापक के ए देशेट्टी यांनी स्वागत केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिवपुत्र चोळे यांनी केले तर आभार लाडप्पा शिंदे यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक वर्ग ,कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले



# देशातील देशद्रोही प्रवृत्ती विरुद्ध लढा देण्यासाठी आणि देशांतर्गत रक्षणासाठी देशातील प्रत्येकानी सैनिकांप्रमाणे काम करावी : मल्लिनाथ महाराज

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी : कारगील युद्धा सारख्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी भारत देशाच्या सीमेवर सर्व सैनिक सज्ज आहेत. पण देशातील देशद्रोही प्रवृत्ती विरुद्ध लढा देण्यासाठी आणि देशांतर्गत रक्षणासाठी देशातील प्रत्येकानी सैनिकांप्रमाणे काम करावी असा प्रतिपादन जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा सदगुरू श्री ओम हवा मल्लिनाथ महाराजांनी केला आहे. शुक्रवार दि.२६ जुलै रोजी बिदर शहराजवळील रिंग रोड नौबाद क्रॉस येथे जय भारत माता सेवा समिति (रजि.) नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा सदगुरू परमपूज्य श्री हवा मल्लिनाथ महाराज निरगुडी यांच्या दिव्य सानिध्यात



कारगिल विजय दिवस जल्लोषात साजरा करण्यात आला.या प्रसंगी महाराज म्हणाले की, सैनिक आणि शेतकरी हे देशाचे दोन डोळे आहेत. सैनिक देशाचे रक्षण करण्यासाठी २४ तास काम करतात. म्हणून आपण सर्वजण येथे शांततापूर्ण जीवन जगत आहोत. प्रत्येकाला सैनिकांचा अभिमान असायला हवा. देशातील प्रत्येकाने सैनिक म्हणून देशांतर्गत काम करावी.देशभक्तीचे धडे शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावी. जर आपण देशाचे रक्षण केले तर देश आपले रक्षण करेल म्हणून प्रत्येकाने आधी देशाची पूजा करावी अशी सल्ला यावेळी देण्यात आला. या प्रसंगी जय भारत माता सेवा समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते वैजिनाथ झलकी, ज्येष्ठ पत्रकार सदानंद जोशी यांची भाषणे झाली.

समितीचे ज्येष्ठ सदस्य निवृत्त पोलीस अधिकारी गुरुसिद्धप्पा बेनकनल्ली, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संतोष रेड्डी, जेडीएस युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राज कड्याल, वीरेश स्वामी, शरणू पाटील, पुष्पक जाधव आदी उपस्थित होते. समिती भालकी तालुकाध्यक्ष पप्पू पाटील खानापुरा यांनी स्वागत व सत्कार केला. कार्यक्रमापूर्वी सिक्कीममध्ये शहीद झालेल्या कमलानगर तालुक्यातील कोराळा गावातील योद्धा अनीला यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आला.या प्रसंगी कारगील युद्धात सेवा बजावणारे सैनिकांना गुलाब पुष्पवृष्टी करून सन्मान व सत्कार करण्यात आला. यावेळी महाराजांनी हजारो देशबांधवांना कारगिल विजय दिवशी गोड मोसंबी चे ज्यूस प्रसाद म्हणून वाटप केले.

> देशाच्या अंतर्गत रक्षणासाठी देश बांधवांनी जात, पात,धर्म, पक्ष निष्ठा बाजूला ठेवून सर्व धर्म समभाव, निसर्गाचे नियम आणि संविधानाचे नियम यांचे नित्य पालन केल्यास भारत देशास कोणताही धोकां निर्माण होणार नाही.
> **– परमपूज्य श्री हवा मल्लिनाथ महाराज राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष जय भारत माता सेवा समिती नवीदिल्ली**

> श्री हवा मल्लिनाथ महाराज हे एक दुर्मिळ राष्ट्रीय संत आहेत. जात,पात, धर्म,पंथ, पक्ष याची पर्वा न करता देशाला प्रथम स्थान देण्याचे कार्य करत असून राष्ट्रधर्मला सर्वोच्च मानतात. आजच्या धक्का धक्की युगात देशाचे कल्याण आणि देशाचे अस्तित्व धोक्यात आणणारे अत्याचार होत आहे.अशा प्रसंगी देशाच्या अस्तित्वासाठी धर्मगुरूंनी समाजाला चांगले मार्गदर्शन करण्याची गरज आहे. **– सदानंद जोशी ज्येष्ठ पत्रकार बिदर**

# तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत रुद्धेवाडी आश्रम शाळेचे यश

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

दुधनी/प्रतिनिधी : अक्कलकोट येथे फत्तेसिह मैदानावरती पार पडलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत रुद्धेवाडी आश्रम शाळेचे १४ वयोगट मुलीत सुस्मिता शिंगे प्रथम क्रमांक पटकावले तर १७ वयोगट मुलात विकास शिंदे प्रथम १७ वयोगट मुली ऐश्र्वर्या माने प्रथम १९ वयोगट मुलात मंगलदास सोनकर प्रथम क्रमांक पटकावून तालुक्यात कुस्ती स्पर्धेत रुद्धेवाडी आश्रम शाळेचे वर्चस्व दिसून आले या सर्व यशवंत खेळाडूंना क्रीडा शिक्षक धोंडू राठोड विजयकुमार खोबरे यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले . म्हणून संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव करवीर मुख्याध्यापिका बेबी करवीर व प्राथमिकमुख्याधापक संजय समाणे यांनी सर्व खेळाडूंचं व विद्यार्थ्यांचा अभिनंदन केले





# तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत दुधनी परमशेट्टी प्रशालेचा यश

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

दुधनी/प्रतिनिधी: अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील श्री एस जी परमशेट्टी प्रशालेतील विद्यार्थी तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. मैंदर्गी येथिल शिवचलेश्र्वर प्रशालेत घेण्यात आलेल्या बुद्धिबळ स्पर्धेत १७ वयोगटांमधील मुलात आर्यन बनसोडे यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविले तर मुलींच्या स्पर्धेत साक्षी मड्डी हे प्रथम क्रमांक पटकावून प्रशालेची यशाची परंपरा कायम राखली आहे. या यशवंत विद्यार्थ्यांना क्रीडा प्रमुख दत्तात्रय हिळळी सर व नागराज कलबुर्गी सर यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले म्हणून संस्थेचे अध्यक्ष परमपूज्य श्री जयगुरुशांतलिंगाराध्य शिवाचार्य महास्वामीजी व मुख्याध्यापक श्री रेवणसिद्ध अलीगावे पर्यवेक्षक श्री लक्ष्मीपुत्र गद्दी सर यांनी त्यांचे अभिनंन केले आहे.

# शिक्षकांनी दिलेल्या योगदानामुळेच शैक्षणिक संस्थांना मोठेपण : आमदार सचिन कल्याणशेट्टी

## कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार समारंभ



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी: शिक्षक वाचन, चिंतन, मनन करतात त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व समाजमान्य होते. अखंड ज्ञानसाधना केल्यामुळे व्यासंग वाढतो. ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. आदर्श विद्यार्थी घडविण्याचे कार्य ते करतात. त्यांच्या कार्यामुळेच शैक्षणिक संस्थांना मोठेपण प्राप्त होते, असे प्रतिपादन आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेतील सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालय व अनंत चैतन्य प्रशाला हन्नूर येथील सेवानिवृत्त शिक्षकांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मुकुंद पत्की,सचिव भिमराव साठे, संचालक मल्लिकार्जुन मसुती,जेष्ठ सदस्य महावीर शहा, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी,कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्रसिंह लोखंडे, हन्नूर प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक साखरे, गुरूपादप्पा आळगी आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, शिक्षक त्यांच्या कार्यामुळे पूजनीय असतात. विद्यार्थ्यांना भविष्यकाळाची दिशा ते दाखवतात. संस्था फक्त त्यांना कार्य करण्याची संधी देत असते. प्रारंभी बापूजी निंबाळकर, शिवानंद पुजारी गुरुनाथ गवंडी, विलास बिराजदार, विश्र्वनाथ चव्हाण, निंगप्पा बिराजदार, खंडेराव घाटगे व अ. करीम मुल्ला (लिपीक) या सर्व सेवानिवृत्त मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व शिक्षकांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले. सूत्रसंचलन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार मुख्याध्यापक अशोक साखरे यांनी मानले.

### शिक्षकांनी सेवानिवृत्तीनंतर पर्यटन करावे ..

शिक्षकांनी गृहस्थाश्रमात व्यतित न होता पर्यटन करावे, योग साधना करावी, मन मुराद सहचरणीसह पर्यटनाचा आनंद घ्यावा असे संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

### जीवन कृतार्थ झाल्याची अनुभूती मिळाली.

शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना अध्यापन केल्यामुळे विद्यार्थी उच्च पदावर कार्य करत आहेत. ही संधी पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्यामुळे मिळाली. संस्थेमुळे कुटुंबाचा विकास झाला. त्यामुळे जीवन कृतार्थ झाल्याची अनुभूती मिळाली असे भावनात्मक उद्गार सेवानिवृत्त शिक्षकांनी यावेळी व्यक्त केले.

# अनंत चैतन्य प्रशालेत पर्यावरण संवर्धनासाठी इको क्लबची स्थापना



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी: शिक्षण मंत्रालय, भारत सरकार व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या शिक्षण सप्ताहाचा सहावा दिवस मिशन लाईफच्या दृष्टीक्षेपात इको क्लब उपक्रम असल्याने पर्यावरण संवर्धन व पर्यावरणविषयक समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे इको क्लब ची स्थापना करण्यात आली.यावेळी माता पालक व मुलींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येऊन वृक्षारोपणाच्या ठिकाणी त्यांच्या नावाचे फलक लावण्यात आले . या वृक्षारोपणाकरिता माता पालक म्हणून हन्नूर च्या माजी महिला सरपंच सौ.संतोषी बाळशंकर, आशा वर्कर सौ. मायव्वा घोडके, सौ. सुनिता बाळशंकर व पाल्य म्हणून श्रृती, साक्षी व शिवानी उपस्थित होत्या. यानंतर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांनी वृक्षारोपण, संवर्धन व रक्षण याविषयी मार्गदर्शन करुन वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करणे आवश्यक असल्याचे सांगितले. याप्रसंगी पर्यवेक्षक श्री ज्ञानदेव शिंदे, प्रा.रविंद्र कालीबत्ते, प्रा. रमेश शिंदे,इको क्लब शिक्षक प्रा. काशीनाथ पाटील, श्री. अप्पासाहेब काळे, श्री. धनंजय जोजन, श्री. शशी अंकलगे, सौ. मृदुलादेवी स्वामी, सौ. मल्लम्मा चप्पळगाव,सौ.स्वप्नाली जमदाडे व विद्यार्थी उपस्थित होते.

# धार्मिक रत्न ... पुरस्कारान गहिनीनाथ महाराज औसेकर सन्मानित



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: शिरोरे प्रतिष्ठान कामखेडा नाशिक यांच्या वतीने श्रीनाथ संस्थानचे सद्गुरु तथा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे देवस्थान समिती पंढरपूरचे सहअध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांना त्यांच्या धर्मकार्य आणि नाथ संस्थानच्या उल्लेखनीय सेवेबद्दल ..धार्मिक रत्न .... हा पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे.

शिरोरे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री महेश शिरोरे,सचिव श्री रमेश शिरोरे, श्री. दत्तात्रय शिरोरे, श्री वासुदेव मुसळे, श्री जितेंद्र वेढणे, श्री दिलीप सोनवणे श्री निलेश मुसळे या प्रतिष्ठानच्या मान्यवर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत श्रीक्षेत्र पंढरीत हा धार्मिक रत्न पुरस्कार औसेकर महाराजांना देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला.

श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांचे वारकरी संप्रदायातील योगदान नाथ संस्थानच्या गुरुपरंपरेतील आणि श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे देवस्थान समितीतील विशेष उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना पुरस्कार व सन्मान असून औसेकर महाराज म्हणजे, संप्रदायातील एक ऊर्जा व दिशा मार्गदर्शक देणारे व्यक्तित्व असे गौरउदगार शिरोळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री महेश शिरोळे यांनी पुरस्कार प्रदान प्रसंगी सांगीतले...

आषाढी वारीच्या पर्वात हा पुरस्कार महाराजांना मिळाल्याबद्दल समस्त वारकरी व शिष्य समुदायात आनंद व्यक्त होत आहे....

# तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या मागण्या मान्य न झाल्याने डीएससी तहसिलदारांकडे जमा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा/ राहुल साबळे : तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या विविध मागण्या शासनाने मान्य न केल्याने २६ जुलै रोजी ७ मंडळ अधिकारी व ३८ तलाठी यांनी आपल्या डी एस सी नायब तहसीलदार आसमा मुजावर यांच्याकडे जमा करून दिल्या व विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे.व निवेदनात म्हटले आहे की जिल्हा प्रशासनाने अवैध रेती उत्खनन व अवैध रेती साठे प्रकरणी महसूल पोलिस व परीवहन या तिन्ही विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची सामुहिक जबाबदारी असताना देखील केवळ तलाठी यांनाच जबाबदार धरून त्यांच्या गैरसोयीच्या ठिकाणी बदल्या तसेच नियतकालिक बदल्यांसाठी पात्र तलाठी यांचे समुपदेशन न घेता अन्यायकारक व बेकायदेशीर बदल्यांचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. विभागीय आयुक्त,



अमरावती यांना पाठविला विदर्भ पटवारी संघ १२०२४ नागपूर, जिल्हा शाखा बुलढाणा यांनी विजेंद्रकुमार धोंडगे जिल्हाध्यक्ष यांचे नेतृत्वात१६ जुलै रोजी जिल्हा प्रशासनाला आंदोलनाची नोटीस दिली आहे. प्रस्तावित अन्यायकारक बदल्या रद्दकरणे, प्रशासकीय बदलीस पात्र तलाठी यांचे समुपदेशन घेऊन बदल्या करणे, विनंती व आपसी बदल्या करणे, जिल्हा स्तरावरील तलाठी आस्थापना रद्द करणे, जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, नवीन लॅपटॉप व प्रिंटर विनाविलंब देण्यात यावे. प्रलंबित तलाठी कार्यालय भाडे, नायब तहसीलदार पदासाठी तलाठी /मं. अ. यांना खात्यांतर्गत विभागीय परीक्षालागू करावी, या शिवाय इतर प्रलंबित आर्थिक व सेवा विषयक मागण्या पूर्ण न झाल्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. या आंदोलनाचा चौथा टप्पा म्हणून आपल्या कार्यालयात तालुक्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांनी आपल्या कार्यालयात डीएससी जमा केल्या आहे.